स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

# महसूल विभाग

# उपविभागीय अधिकारी कार्यालय, निफाड उपविभाग, निफाड


मु.पो. निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक, पिन कोड 422303

वेब :-www.nashik.nic.in ई-मेल :-prantniphad@gmail.com दुरध्वनी क्र. (02550) 241152


क्र.जमा/बांध.परवानगी/एस.आर/69/2019

निफाड, दिनांक. 21 / 6 /2023

प्रति,

श्री. वृंदावन बिल्डर्स तर्फे

भागीदार तुषार अजित साबद्रा व इतर,

रा. लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक

**विषय** :- मौजे लासलगांव, ता. निफाड जि. नाशिक येथील गट नंबर 158/प्लॉट/5 क्षेत्र 447.97 चौ.मी. यात रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेबाबत.

**संदर्भ** :- 1. आपला दिनांक 08/11/2019 रोजीचा अर्ज

2. सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडील क्र.बांप/मौ.लासलगांव ता.निफाड/ गट नं. 158/ससंनरना/309 दिनांक 25/01/2022
3. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक 15/06/2022 रोजीचे बांधकाम परवानगीचे पत्र.
4. सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडील जा.क्र.पुर्णत्व दाखला/मौ. लासलगांव ता. निफाड/ग.न.158/ससंनरना/973 दिनांक 02/05/2023

वरील विषयाबाबत आपण संदर्भिय अर्जान्वये विषयांकीत मिळकतीस बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेबाबत या कार्यालयाकडे केलेल्या अर्जानुसार सहाय्यक संचालक, नगररचना नाशिक यांचे अभिप्राय मागविले असता, त्यांचेकडील पत्र जा.क्र.पुर्णत्व दाखला/मौ. लासलगांव ता. निफाड/ग.न.158/ससंनरना/973 दिनांक 02/05/2023 अन्वये विषयांकीत मिळकतीच्या बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) देण्याच्या अनुषंगाने शिफारस केलेली असून भोगवटा प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले आहे. त्यानुसार विषयांकीत भुखंडाचे भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) व मंजुरी पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रातील तसेच मुळ बिनशेती आदेश व त्यालगतचे सहाय्यक संचालक, नगररचना, नाशिक यांचेकडील संदर्भिय पत्रातील शर्ती/अटींचे पालन करणे आपणावर बांधनकारक राहील.

(हेमांगी पाटील)
उपविभागीय अधिकारी,
निफाड उपविभाग निफाड

**प्रत** :-

1. तहसिलदार निफाड यांचेकडे माहीतीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी रवाना.
2. सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडेस भोगवटा प्रमाणपत्राचे 1 प्रतीसह.
3. तलाटी लासलगांव ता. निफाड यांना माहीतीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी रवाना.
4. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लासलगांव, ता.निफाड यांना माहीतीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

(हेमांगी पाटील)
उपविभागीय अधिकारी,
निफाड उपविभाग निफाड

**भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)**

जा.क्र.

दिनांक

मौजे- लासलगाव, ता.निफाड, ग.नं.१५८, भु.क्र. ५ मधील क्षेत्र ४४७.९७ चौ.मी. मधील "रहिवास" प्रयोजनार्थ इमारत बांधकाम नकाशांना सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र क्र. बांप/मौ.लासलगाव, ता.निफाड/ग.नं.१५८/ससंनरना/३०९, दि.२५.०१.२०२२ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे व त्याप्रमाणे बांधकाम नकाशांना उपविभागीय अधिकारी, निफाड उपविभाग, निफाड यांचेकडील पत्र क्र.६९/२०१९, दि.१५.०६.२०२२ अन्वये बांधकाम आराखडयास मंजूरी प्रदान केलेली आहे. अर्जदार यांनी मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण केलेनंतर इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

अर्जदार यांनी इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याबद्दलचा दि.२७.१२.२०२२ रोजीचा प्रस्ताव उ उपविभागीय अधिकारी, निफाड उपविभाग, निफाड कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावासोबत वास्तुअभियंता श्री. किरण आरोटे यांचे सदर बांधकामाचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याप्रमाणे सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक या कार्यालयातील सहायक नगर रचनाकार, यांचेकडून दि. १७.०३.२०२३ रोजी बांधकामाची तपासणी केलेली आहे. सदर तपासणी वेळी या कार्यालयाने मंजुरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशानुसार बांधकाम केल्याचे दिसून येते.

**<u>बांधकामाचा तपशिल</u>**

भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेल्या रहिवास इमारतीचे बांधकाम ग.नं.१५८, भु.क्र.५ मधील क्षेत्र ४४७.९७ चौ.मी. बांधकाम हे या कार्यालयाने मंजूरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशानुसार आहे.

वरील बांधकाम तपशीलामध्ये नमुंद केलेनुसार इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) खालील अटीस अधिन राहुन निर्गमित करणेची शिफारस करणेत येत आहे.

१. स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन, पुढील, मागील व बाजुची समासिक अंतरामधील जागा कायम खुली ठेवावी.
२. नियोजन बांधकामामध्ये मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे झाल्यास किंवा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
३. नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीने हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालक यांची राहील.
४. **विषयांकित जागेत Rain Water Harvesting व Solar Water System कार्यान्वीत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.**

सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांनी पत्र जा. क्र. बांप/मौ.लासलगाव, ता.निफाड/ग.नं.१५८/ससंनरना/३०९, दि.२५.०१.२०२२ अन्वये मंजुरीची शिफारस केलेल्या पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

सबब उपरोक्त तपशिलामध्ये नमूद रहिवास वापराचे इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

(अंकुश सोनकांबळे)
**सहायक संचालक, नगर रचना,**
**नाशिक शाखा, नाशिक**

(हेमांगी पाटील)
**उपविभागीय अधिकारी,**
**निफाड उपविभाग निफाड**

**प्रत :-**

१. सहायक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक
२. वृंदावण बिल्डर्स तर्फे भागीदार श्री.तुषार अजित साबद्रा व इतर,रा.लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक
३. श्री. किरण आरोटे, वास्तुविशारद, रा. नाशिक
४. ग्रामसेवक, ग्रामपंचायत लासलगाव ता. निफाड, जि. नाशिक यांना माहितीसाठी व कर आकारणीकरीता अग्रेषित.